

# सांज-सकाळ

## (एड्‌सची माहिती)


मीनाक्षी स्वामी

अनुवाद

गौरीशंकर गंगा



NBT INDIA

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

₹ 25.00

ISBN 812373182-5

9788123731827

12132052

ISBN 978-81-237-3182-7

प्रथम प्रकाशन : 2000 *(शके 1922)*
पहिली आवृत्ती : 2003 *(शके 1924)*
दुसरी आवृत्ती : 2009 *(शके 1931)*
तिसरी आवृत्ती : 2012 *(शके 1934)*
चौथी आवृत्ती : 2013 *(शके 1934)*

मूळ © मीनाक्षी स्वामी, 1996
मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 2000

Sanjh-Savera *(Marathi)*

**₹ 25.00**

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया
नेहरू भवन, 5 इन्स्टिट्युशनल एरिया, फेज-II
वसंत कुंज, नवी दिल्ली-110 070 यांनी प्रकाशित केले.

*नवसाक्षर साहित्यमाला*

# सांज-सकाळ
## (एड्सची माहिती)

**मीनाक्षी स्वामी**

अनुवाद
**गौरीशंकर गंगा**

चित्रे
**स्वप्न सरकार**

**नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया**



रघू पुजारी काकांचा एकुलता एक मुलगा होता. तो वर्षाचा असतानाच आईविना पोरका झाला. काकांनी मुलाला खूप मायेने लहानाचा मोठा केला.

गावभराला रघूचा लळा होता. लोकांचा लाडका रघू बघता बघता मोठा झाला. उंचापुरा दणकट बांधा. रघू देखणा गडी दिसू लागला. त्याचे मनही असेच सुंदर होते. गावातील लोकांची लहानमोठी कामे तो मन लावून करीत असे.

गावातील अनेक मुली रघूवर फिदा होत्या. पण रघू पडला साधाभोळा. हनुमान भक्त. तो काकांबरोबर नियमित मंदिरात जात असे. पूजापाठ करे.

हो, रघूला एकच आवड होती. ती म्हणजे ट्रक चालवायची. बाळपणापासून त्याला ट्रक चालक होण्याची ओढ होती. छोटा रघू वारंवार गांवाबाहेर धाव घेत असे. तो तासन्तास वाटेने येणारे-जाणारे ट्रक बघत राही. तेथील धाब्यावर ये जा करणाऱ्या चालक मंडळीशी त्याची चांगलीच गट्टी जमली होती. हळूहळू रघूने त्यांच्याकडून ट्रक चालवणे शिकून घेतले.

एक दिवस तिथे येणारा करतार ड्रायव्हर रघूला भेटला. त्याने रघूला सांगितले की, त्याच्या मालकाने एक

नवीन ट्रक विकत घेतला आहे. रघूला हवे तर चालक म्हणून नोकरी मिळू शकते.

रघूला आणखी काय हवे होते? काकांनी होकार दिला आणि रघू कामावर हजर झाला.

काकांना आता रघूच्या लग्नाचे वेध लागले होते. मुलींचा काही तोटा नव्हता. गावातील शंकररावांची मोठी मुलगी राधा चुणचुणीत होती. तिला आपली सून बनवावी, असा काकांचा विचार होता. यासाठी शंकरराव पण तयार होते.

बघता बघता महिनाभरात राधा सून म्हणून काकांच्या घरी आली.

येताच राधाने घराची जबाबदारी घेतली. आता रघू आणि पुजारी काकांना रोज गरम जेवण मिळू लागले.

रघूराधाचा संसार फुलू लागला. दोघांचे एकमेकावर जीवापाड प्रेम होते. रघू कामासाठी परगावी जात असे. तेथून राधेसाठी बांगड्या, तर कधी पैंजण, कधी रंगीबेरंगी साड्या, कधी टिकल्या असं काही ना काही घेऊन येई.

असे दिवस चालले होते. रघू कामासाठी बाहेर गेला की राधेच्या आठवणीने बेचैन होई. कधी एकदा घरी जाईन असे त्याला वाटे. लग्नाआधी त्याला घरात करमत नसे. पण आता राधेचे छनछन् वाजणारे पैंजण, बांगड्याची किणूकिणू, गोड हसू आणि प्रेमळ बोल त्याचे मन बांधून





ठेवीत. घरातून पाऊल निघत नसे. पण राधा...ती त्याला बळे बळे कामावर पाठवायची.

एके दिवशी रघू ट्रक घेऊन परगावी गेला. वाटेत त्याला अपघात झाला. तिकडून दुसरा ट्रक येत होता. त्या ट्रकचा चालक होता हरी. हरीने रघूला दवाखान्यात नेले.

रघूच्या डोक्याला जखम झाली होती. खूप रक्तस्राव झाला होता. त्याला ताबडतोब रक्त देणे गरजेचे होते.

हरी चांगला माणूस होता. रक्तदान करणे हे तर पुण्य कार्य आहे. म्हणून रघूला रक्त देण्यास तो तयार झाला. नशिबाने हरी आणि रघूचे रक्त जुळत होते.



डॉक्टरांनी हरीचे रक्त रघूला दिले.

रघू लवकरच शुद्धीवर आला. रघूचे प्राण वाचले म्हणून हरी खूष होता. डॉक्टरांनी रघूला सांगितले की हरीने रक्त दिल्यामुळे तुझे प्राण वाचले. दवाखान्यात हरीने रघूची खूप देखभाल केली. त्याने रघूच्या घरी सारी हकीकत कळविली.

नवा मित्र मिळाल्याने रघूला खूप आनंद झाला. लवकरच दोघांची गाढ मैत्री झाली.

तोवर पुजारीकाका आणि त्याच्या गावातील दुसरे लोकही तिथे येऊन थडकले, रघूच्या जीवाला आता धोका नव्हता. गावातील लोकानी हरीच्या ट्रकमधूनच रघूला गावी आणले.

राधेने देखील रघूची खूप सेवा केली. तो लवकरच अगदी बरा झाला.

काही दिवस आराम करून कामावर जाऊ लागला. हरी गावावरून जातांना रघूच्या घरी येऊन भेटून जायचा. पुजारीकाकांचा हरीवर जीव जडला होता. हरीने रघूला जीवदान दिले होते. म्हणून राधा देखील त्याच्याशी खूप आदराने वागायची.

हे घडून बरेच दिवस होऊन गेले. सगळे सुरळीत चालले होते. पण अलीकडे रघू सलग दोनचार दिवस ट्रकवर जाऊ शकत नसे. त्याला अशक्तपणा वाटे. एक दोन दिवसातच तो थकून जायचा. सुरुवातीला त्याने

याकडे थोडा कानाडोळाच केला.

पण दिवसे न् दिवस अशक्तपणा वाढतच चालला होता. अशक्तपणा आणि थकवा यामुळे तो सारखा चिडचिड करायचा.

नेहेमी रघूचे अंग ठणकायचे. त्याला वारंवार सर्दी खोकला होऊ लागला. जेवण देखील नीट जाईनासे झाले. एकदोन घास घेतले की बेचैन होऊन तो ताटावरून उठायचा. राधा खूप मनधरणी करायची. मग तो कसेबसे दोनचार घास पोटात ढकलायचा. बरेचदा त्याला जुलाब देखील होत.

दिवस चालले होते. रघूचा अशक्तपणा वाढत चालला होता. बरेचदा त्याचे डोके देखील दुखायचे. नजर देखील कमी झाली होती. त्याची त्वचा कोरडी पडत चालली होती.

मग रघूला वारंवार ताप येऊ लागला. जवळ जवळ आठवडाभर अंगात ताप राहू लागला. औषध घेतले आणि आराम केला की थोडे बरे वाटायचे. पण कामावर जाऊ लागला की परत तेच. अशक्तपणा व थकवा आणि ताप.

आता तर रघूचा ताप औषधांनीही कमी होत नव्हता. मानेवर देखील सूज आली होती. वजन देखील झरझर कमी होत होते. धडधाकट रघू बघता बघता दुबळा आणि किडकिडीत दिसू लागला. डोळ्यांभोवती काळी



वर्तुळे आली. डोळे खोल गेले. गालफडे बसली. निस्तेज चेहरा आणि थकलेले शरीर! आता रघूला ओळखणेही कठीण झाले होते.

तो आता नियमित कामावर जाऊ शकत नसे. वारंवार सुटीची गरज पडे. कामावर गेला तरी आधीसारखे काम होत नसे. लवकरच त्याची नोकरी सुटली.

राधा खूप काळजीत पडली. शेवटी झाले आहे तरी काय? पुजारीकाका रघूची ढासळती प्रकृती पाहून काळजीत पडले होते.

गावातील डॉक्टरांनी रघूला शहरातील मोठ्या दवाखान्यात दाखविण्यास सांगितले. पुजारीकाका रघूला तिकडे घेऊन गेले.

पुजारीकाकांनी तेथील डॉक्टरांना रघूसंबंधी पुरी माहिती सांगितली. ती ऐकून डॉक्टर विचारात पडले. त्यानी रघूला तपासले. मग म्हणाले, "रघूच्या रक्ताची तपासणी करावी लागेल."

डॉक्टरांचा आवाज गंभीर होता. तो ऐकून पुजारीकाका चिंतातूर झाले. त्यांनी विचारले, "डॉक्टर, तसे काही विशेष नाही ना?"

डॉक्टर म्हणाले, "ते रक्त तपासणीनंतरच कळेल."

डॉक्टरांनी रघूचे रक्त तपासून घेतले. तपासणीचा अहवाल पाहून ते काहीच बोलले नाहीत. मग पुजारीकाकांनी खोदून खोदून विचारले. तेव्हा त्यांनी



सांगितले, ''रघूला असा आजार झाला आहे की ज्याच्यावर काही इलाज नाही.''

पुजारीकाका बेचैन झाले. ''ज्यावर उपाय नाही असा कोणता हा आजार असेल बरे?''



''डॉक्टर, काय नाव आहे या आजाराचे?'' पुजारीकाकांनी विचारले.

''या भयंकर आजाराचे नांव आहे एड्स,'' डॉक्टरांनी सांगितले.

पुजारीकाका तर पहिल्यांदाच हे नाव ऐकत होते. गावात कधी या आजाराविषयी त्यांनी ऐकले नव्हते.

खरेच, हा कुठला तरी भयंकर रोग असला पाहिजे. डॉक्टरांनी म्हणूनच रघूला दवाखान्यात दाखल करून घेतले आहे.

काकांना खूप वाईट वाटले. पण त्यांनी यातले काहीच राधेला सांगितले नाही.

डॉक्टरांनी काकांना म्हटले, "राधाचे रक्तही तपासावे लागेल."

पुजारीकाकांना खूप नवल वाटले. ते म्हणाले, "का?"

डॉक्टरांनी सांगितले, "कारण हा आजार रघूकडून राधेलाही होऊ शकतो."

पुजारीकाका म्हणाले, "अस्सं! मग रघूकडून हा आजार मलाही झाला असेल. आम्ही सगळेजण एकत्र उठतो बसतो, व खातो पितो."

डॉक्टर हसून बोलले, "असं नाही. हा आजार बरोबरीने राहिले किंवा खाणेपिणे केल्याने नाही होत. रोग्याचे हात हातात घेतले किंवा त्याचे कपडे, थाळ्या वापरल्या तरीही होत नाही. हा आजार रक्त आणि शारीरिक संबंधातूनच पसरतो. म्हणून राधालाही होऊ शकतो."

"पण राधा तर अगदी चांगली आहे," पुजारीकाका म्हणाले.



डॉक्टरांनी समजावले, "तिला लागण झाली नसेल तर बरेच आहे. कदाचित विषाणू तिच्या शरीरात गेलेही असतील. पण लक्षणे अजून दिसत नाहीत."

काका म्हणाले, "बरं, ठीक आहे. तिचेही रक्त तपासून घेऊ."

दुसऱ्या दिवशी राधेच्या रक्ताची तपासणी झाली. राधेच्या शरीरात रोगाचे विषाणू नव्हते. रघूशी बोलल्यावर डॉक्टरांना समजले की, त्यांना लवकर मूल नको होते. म्हणून ते निरोधचा वापर करत होते. राधा निरोधमुळे या आजारापासून वाचली होती.

डॉक्टरांनी यावर सांगितले की राधाला जर मूल झाले असते तर तिच्या मुलालाही हा आजार झाला असता.

पण रघूला हा आजार झालाच कसा?

डॉक्टरानी रघूकडे चौकशी केली. मग कळले की अपघात झाला तेव्हा रघूला रक्त दिले गेले होते. त्या रक्तात एड्सचे विषाणू होते. त्यामुळे रघूला हा आजार झाला.

बिचाऱ्या राधेला रघूच्या या आजाराबाबत काहीच माहिती नव्हती. ती अगदी मनापासून रघूची सेवा करत होती.

असे कितीतरी दिवस निघून गेले. एक दिवस रघूच्या जवळच्या पलंगावर एक नवा रोगी आला. त्याला रघूचाच आजार होता. तो पण अगदी दुबळा झाला होता.

रोग्याने राधेला पाहिले. तो म्हणाला, "वहिनी मला ओळखलंत का?"

राधाने त्याच्याकडे निरखून पाहिले. नवल वाटून म्हणाली, "अरे, हरीभाऊ आपण इकडे कसे? किती रोड झाला आहात. अगदी ओळखायलाही येईना. तुम्हाला झाले आहे तरी काय?"

हरी उदास झाला. तेवढ्यात पुजारीकाका आले. हरीची दशा बघून त्यांना खूप वाईट वाटले. हरी आणि रघूला एकच आजार होता.

दवाखान्यातील नर्सने राधाला सांगितले की हरीला हा आजार त्याच्या बाहेरख्याली स्वभावाने झाला आहे. कारण तो ज्या बायांजवळ गेला त्यांना एड्स रोग होता.

राधाला धक्का बसला. तिच्या मनात आले, आपल्या रघूला पण हाच आजार आहे.

राधा नर्ससमोर तर काही बोलली नाही. पण ती मनात विचार करू लागली. रघू तर बरेचदा कामासाठी घराबाहेर राहायचा. मग उघड आहे. कोणी तरी त्याला खरे खोटे सांगून तसल्या बायकांकडे घेऊन गेले असेल...पण राधाचे दुसरे मन म्हणे, रघू असे कधीच करणार नाही. आपल्यावर त्याचा किती जीव आहे...पुन्हा तिला वाटे, झालंही असेल चुकून. कसा बेचैन होता तो. अगदी तहानभूक विसरून गेला होता. नक्कीच तशा कुणीतरी बाईत जीव गुंतवून बसला असेल.





विचार करता करता तिला रघूचा राग येऊ लागला. मनातल्या मनात ती दुःखी होत होती. रघूवर तिचा केवढा विश्वास होता. पण रघूने तिचा असा कसा घात केला?

रघूच्या खोलीबाहेर राधा हाच विचार करीत थांबली होती. तेवढ्यात पुजारीकाका आले. राधाला उदास बसलेले पाहून त्यांना वाईट वाटले.

त्यानी राधाच्या डोक्यावर मायेने हात फिरवला. विचारले, "मुली, काय झालंय तुला?"

राधेचे डोळे भरून वाहू लागले. एक तर रघूच्या आजाराचे दुःख आणि दुसरे हे विश्वासघाताचे दुःख.

राधाने मनातले सारे पुजारीकांकासमोर उघड करून सांगितले. नर्सने जे सांगितले होते, तेही सांगितले.

पुजारीकाकानी राधाला समजाविले—"रघूला हा आजार वाईट बायकाच्या संगतीने झाला नाही. हा आजार त्याला हरीचे दूषित रक्त दिल्याने झालेला आहे. रघूला हरीचे रक्त दिले तेव्हा हरीच्या रक्तात एड्सचे विषाणू होते."

राधाला काकांचे हे सांगणे खरेच वाटेना. तिला वाटले काका रघूची बाजू घेऊ लागले आहेत. मला खोटा दिलासा देऊ लागले आहेत.

काकांना राधाच्या मनातील किंतू समजला. ते तिला भरवसा देण्यासाठी डॉक्टरांकडे घेऊन गेले. डॉक्टरांनीही राधाला हीच गोष्ट सांगितली.

पण तरीही राधाला पुरा विश्वास वाटत नव्हता.



मग डॉक्टरांनी तिला एका लहान मुलापाशी नेले. तो मुलगा आजारी होता. डॉक्टरांनी सांगितले की या मुलालाही तोच रोग झाला आहे.

राधाला नवल वाटले. एवढासा मुलगा. आणि एवढा मोठा आजार!

"याला हा आजार कसा झाला?" तिने विचारले.
"या मुलाला हा रोग आईकडून झाला आहे," डॉक्टरांनी सांगितले.

राधाने विचारले, "मग त्याच्या आईला हा रोग कुठून झाला?"

"त्याच्या आईला हा आजार गोंदवून घेतले म्हणून झाला आहे," बाळाची आई जवळच झोपलेली होती. डॉक्टरांनी तिकडे बोट केले.

"म्हणजे हा रोग गोंदणामुळेही होऊ शकतो?" राधेने घाबरून विचारले.

डॉक्टरांनी सांगितले, "कान, नाक कोरणे आणि गोंदविताना सुई विषाणूरहित न करता वापरल्याने हा रोग होऊ शकतो. हा रोग शारीरिक संबंधातून आणि रक्तामार्फत होऊ शकतो. जर इंजेक्शन देतांना सुई विषाणूरहित केली नसेल तरी हा रोग होऊ शकतो."

"मग काय करावे लागेल? इंजेक्शन घेणेच सोडून द्यायचे काय?" पुजारीकाकांनी विचारले.

डॉक्टरांनी सांगितले, "आजारी झालात अन् गरज



पडली तर इंजेक्शन घ्यावेच लागणार. पण इंजेक्शनच्या अगोदर सुई निर्जंतुक असावी लागते. शक्य तोवर एकदा बापरून फेकून देता येणारी सुई बापरली पाहिजे."

तेवढ्यात नर्स आली आणि म्हणाली, ''गावाचे लोक रघूला पाहायला आले आहेत."

पुजारीकाका आणि राधा उठून उभी राहिली. आता राधाच्या मनात काही शंका नव्हती. तिला रघूवर पूर्ण विश्वास आला होता. आपल्याच विचारांची तिला खंत वाटत होती.

ती खोलीत आली. पाहिले तर सरपंच, शमीम भाई, जगदीशचे वडील व हरपाल काका बसले होते.

हरी त्यांना सांगत होता, ''माझ्यामुळेच रघूला हा आजार झाला. मी जर रघूला रक्त दिले नसते तर रघूला हा आजार झाला नसता." बोलता बोलता हरीचा गळा दाटून आला.

सरपंचानी हरीची समजूत घातली, ''पण यात तुझा काय दोष आहे? तू काय हे जाणून बुजून थोडेच केले आहेस?"

''हो, मला काय माहीत होते? नाहीतर मी रघूला रक्त विकत घेऊन दिले असते."

तेव्हाच डॉक्टर खोलीत आले. त्यांनी हरीचे बोलणे ऐकले होते. ते म्हणाले, ''बाजारातून घेतलेल्या रक्तात रोगाचे विषाणू असू शकतात."

शमीमकाकांनी विचारले, "मग रक्ताची गरज पडली तर काय करावे?"

डॉक्टरांनी सांगितले, "शक्यतो आपल्या घरचे लोक किंवा ओळखीपाळखीच्या लोकांचे रक्त घेणे चांगले. पण तेही रक्त तपासले पाहिजे."

जगदीशचे वडील म्हणाले, "पण ज्याचे रक्त घेतले त्याला अशक्तपणा नाही का येणार?"

त्यावर डॉक्टर म्हणाले, "मित्रा, तसे नाही. निरोगी माणसाच्या शरीरात अगोदरच भरपूर रक्त असते. रक्त घेतले जाईल तेवढे लवकर रक्त तयार होते. अशक्तपणा तर मुळीच जाणवत नाही."

पुजारीकाका म्हणाले, "डॉक्टर, रघूला रक्त देतांना हरीला तर वाटले होते की, रक्त देणे पुण्य कार्य आहे. मरणाऱ्या माणसाला नवे जीवन मिळेल."

डॉक्टर म्हणाले, "हरीनं खरंच चांगलं काम केलं होतं. पण हरीच्या रक्ताची तपासणी केली असती तर त्याचा आजार कळला असता. मग रघूला त्या रोगापासून आपण वाचवू शकलो असतो."

काका म्हणाले, "वेळीच तपासणी केली असती तर हरीचा रोग लक्षात आला असता. तोही ठीक झाला असता."

डॉक्टर म्हणाले, "नाही काका, हा आजार पूर्ण बरा होऊ शकला नसता. पण लवकर समजले तर काळजी



घेऊन इतरांना या रोगापासून वाचवू शकलो असतो."

हे ऐकून राधा सुन्न झाली. तिला आतापावेतो कुणी हे सांगितले नव्हते. तिचा चेहरा उतरला. तिचे डोळे भरून आले.

तिने जडपणे विचारले, "काय, या आजारावर काही उपाय नाही?"

डॉक्टरांनी सांगितले, "होय ताई, तुला हे ऐकून दुःख होईल. पण मी तुला अंधारात ठेवणार नाही. या आजारावर काही उपाय नाही, कसलीही लस नाही किंवा गोळी नाही. हा रोग होऊ नये म्हणून सावध असणे हाच चांगला उपाय आहे."

"पण कसे?" काकांनी विचारले.

डॉक्टरांनी सांगितले, "हा रोग टाळण्यासाठी पौष्टिक आहार घेतला पाहिजे. नियम संयमाने जीवन जगले पाहिजे. व्यायाम केला पाहिजे. त्यामुळे शरीर मजबूत होईल."

काका म्हणाले, "हे शरीर मजबूत झाले तर विषाणूची बाधा होणार नाही हो. ना?

डॉक्टर म्हणाले, "आणि हो, कधी रक्त घेताना रक्ताची तपासणी केली पाहिजे. इंजेक्शन घेताना सुई निर्जंतुक केली पाहिजे. वाईट व्यसनांपासून दूर राहावे."

सरपंचांनी विचारले, "काय नशेच्या पदार्थातही एड्सचे विषाणू असतात का?"



डॉक्टरांनी सांगितले, "नाही, नशेच्या पदार्थात एड्सचे विषाणू नसतात. पण व्यसनांमुळे शरीर दुबळे होते. दुबळ्या शरीरावर विषाणू सहज ताबा मिळवितात. काही नशेचे पदार्थ सुईने टोचून घेतले जातात. त्यावेळी सुई साफ केली जात नाही. एकमेकांच्या सुया वापरल्याने त्यांबरोबर रोगाचे विषाणूही येतात. न्हाव्याच्या वस्तऱ्यामार्फत विषाणूचा प्रसार होऊ शकतो. वस्तरा साफ ठेवणे अगदी जरूरीचे आहे. खरं तर हे विषाणू रक्त आणि शारिरीक संबंधातून पसरतात."

सरपंचांनी आश्चर्याने विचारले, "अस्सं होय."

डॉक्टरांनी सांगितले, "होय. त्यासाठी केवळ आपल्या जोडीदाराबरोबर संबंध ठेवले पाहिजे. अनोळखी, चरित्रहीन, बाजारू बाया किंवा पुरुषाशी संबंध ठेवलेत तर हा रोग सहज लागू शकतो. आणि हो, आपल्या बायकोशी नैसर्गिक पद्धतीनेच संबंध ठेवले पाहिजे. नाही तर रोगाची लागण होते."

असे म्हणून डॉक्टर जरा थांबले. नंतर विचार करून म्हणाले, "अनेक बायकाचे नवरे त्यांना चुकीच्या पद्धतीने संबंध ठेवण्यास भाग पाडतात. अशा वेळी बायकांनीच विरोध केला पाहिजे."

सरपंच म्हणाले, "जर नवरा इतर बायांशी संबंध ठेवत असेल तर? अशा नवऱ्याशी बायकोने संबंध ठेवूच नये. यातच आपले व मुलांचे हित आहे. नाही का?"

डॉक्टर म्हणाले, “सरपंच, आपण अगदी बरोबर बोललात!”

जगदीशचे वडील म्हणाले, “डॉक्टरांनी खूप महत्वाच्या गोष्टी सांगितल्या. या गोष्ट साऱ्या गावाला माहीत हव्यात.”

सरपंच म्हणाले, “अगदी बरोबर. मी तोच विचार करतोय. आपण सारे मिळून आपल्या गावकऱ्यांना एड्स टाळण्यासाठी सावधान केले पाहिजे.”

पुजारीकाका म्हणाले, “ही सारी माहिती आधीच असती तर रघूला हा आजार झाला नसता.”

जगदीशचे वडील म्हणाले, “हो. आज ठरवूनच टाकतो. उद्यापासूनच आम्ही गावकऱ्यांना सगळे समजावून सांगू. म्हणजे ते एड्सपासून वाचू शकतील.”

लोकांचा हा उत्साह बघून डॉक्टरांना खूप बरे वाटले.

ते म्हणाले, “हे फार मोठे काम आहे.”

सांज झाली होती. समोरील खिडकीतून सूर्य मावळतांना दिसत होता. पण गावकऱ्यांच्या मनात सकाळचा कोवळा उजेड होता.

Printed at : J.J. Offset Printers Noida (U.P.)